| | |
|---|---|
| MHJN020005162014 | वि.दि.वा.क्र.४१/२०१४<br>भारत–वि–मनिष व ईतर |

## निशाणी क्र.१३७ वरील आदेश
## (दि.१६.१२.२०२५ रोजी पारीत)

. प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांच्या विरुध्द् पारित झालेला विना उलटतपास आदेश रद्य करुन वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.६ यांचे अर्जातील कथन असे की,वादीने प्रतिवादी विरुध्द् करारपूर्तीचा दावा दाखल केलेला असून त्यांना दाव्यात पक्षकार म्हणुन समाविष्ट केले नव्हते. परंतु वाद मिळकतीमध्ये सदर प्रतिवादीचे हितसंबंध असल्याने त्यांनी आदेश १ नियम १०(२),दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये अर्ज दिला होता व सदर अर्ज मंजूर झाल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र.६ म्हणुन दाव्यात समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर त्यांनी लेखीजबाब दाखल केला. परंतु घरगुती अडचणीमुळे प्रतिवादी स्वतः व त्यांचे विशेष मुख्त्यारधारक यांचे विधिज्ञ बाहेरगावी गेलेले असल्याने ते विधिज्ञांशी संपर्क करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द् विना उलटतपास आदेश पारित झालेला आहे.

३. प्रतिवादी क्र.६ यांचे अर्जातील कथन असे की,त्यांनी यापूर्वी देखील विना उलटतपास आदेश रद्य करण्यासाठी अर्ज दिला होता व मा. न्यायालयाने रु.५००/–खर्च आकारुन तो मंजूर केला होता. त्यानंतर त्यांना उलटतपास घेण्याची संधी दिली,परंतु वादी न्यायालयात गैरहजर राहील्यामुळे त्यांना उलटतपास घेता आला नाही. त्यानंतर पुन्हा मा.न्यायालयाने विना उलटतपास आदेश पारित केला. त्यांनी जाणीवपूर्वक वादीचा उलटतपास घेण्यास टाळाटाळ केलेली नसून उलटतपास घेण्याची परवानगी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदतच होईल व त्यांच्यावर अन्याय होणार नाही. करीता अर्जदाराचा अर्ज मंजूर करुन त्यांच्या विरुध्द् पारित झालेला विना उलटतपास आदेश रद्य करण्यात यावा.

४. प्रस्तुत अर्जाकामी वादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.१५१ वर सादर केलेले आहे. त्यांनी प्रतिवादी क्र.६ च्या अर्जातील मजकूर आमान्य केलेला असून अतिरीक्त लेखीजबाबात असे कथन केले की,त्यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या विरुध्द् करारपूर्ती व मनाई हुकूम मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात वादीचा पुरावा संपलेला आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला आहे. परंतु प्रतिवादीने वादीचा उलटतपास घेतला नाही याची माहिती असताना अभिलेखावर कोणत्याही

प्रकारचा अर्ज दिला नाही. केवळ प्रस्तुत दाव्यात गुंतागूंत वाढवणे आणि सदर दाव्याच्या न्यायनिर्णयास उशिर व्हावा या उद्देशाने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

५. वादी यांचे लेखीजबाबातील पुढे असे कथन की,प्रतिवादी क्र.६ यांचा वााद मिळकतीच्या विक्री करारनाम्याशी कोणताही हक्कसंबंध नसून वादीचा प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यासोबत व्यवहार झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ यांना वादीचा उलटतपास घेण्याचा कोणताही अधिकारी नाही. करीता प्रतिवादी क्र.६ यांचा प्रस्तुतचा अर्ज रु.१०,०००/–खर्च रकमेसह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

६. अभिलेखावरील दस्तऐवज आणि लेखी म्हणणे याचे अवलोकन केले.

७. प्रतिवादी यांचा मौखीक युक्तीवाद ऐकला. तसेच वादी यांनी नि.क्र.१५३ अन्वये प्रस्तुत अर्जाबाबत दाखल केलेले लेखी म्हणणे हाच त्यांचा मौखीक युक्तीवाद म्हणुन ग्राहय धरण्यात यावा अशी पुरशिष दाखल केलेली आहे.

८. महत्वाची बाब म्हणजे वादी यांनी प्रतिवादी विरुध्द् करारपूर्ती आणि मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचे विधिज्ञ बाहेरगावी गेलेले असल्याने वादीच्या साक्षीदाराचा

उलटतपास घेण्यास असमर्थ ठरले व त्यांचे विरुध्द् विना उलटतपास आदेश पारित झाला. तसेच प्रतिवादी क्र.६ यांच्या म्हणण्यानुसार त्यांचे विरुध्द् यापूर्वी देखील विना उलटतपास आदेश पारित झाल्यामुळे त्यांचा खर्च रक्कम भरणा करण्याच्या अटीवर सदरील अर्ज मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा नि.क्र.७० वर विना उलटतपास आदेश पारित झालेला असल्यामुळे प्रतिवादी क्र.६ यांना शेवटची संधी म्हणुन प्रस्तुतचा अर्ज खर्च रक्कम रु.१०००/–वादीस देण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र.६ यांचा नि.क्र.१३७ वरील अर्ज खर्च रक्कम रु.१०००/–वादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र.६ यांना वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची अंतिम संधी म्हणुन परवानगी मंजूर करण्यात येते. |
| ३ | प्रतिवादी आणि वादी यांना निर्देशित करण्यात येते की,प्रस्तुत दावा सन–२०१४ पासून प्रलंबीत असल्यामुळे तो लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. |

ASHVINI PRAVIN DIWAN
Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2025.12.16 16:59:24 +0530

(अश्वीनी प्र. दिवाण)

दि.१६.१२.२०२५ दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना

**प्रमाणपत्र**

निवेदन करण्यात येते की,पी.डी.एफ.फाईल मधील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–शि.दि.देशमुख

न्यायालयाचे नाव :–दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना

पी.डी.एफ.दिनांक :–दि.१६.१२.२०२५

लघुलेखक(म.)